महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २५२ वे | दिनांक : ०८/०९/२०२६ | वार : मंगळवार




## महापौर रितू तावडेंची घोषणा:विशाखा राऊतांचे नगरसेवकपद रद्द, ठाकरे गटाला मोठा धक्का





**मुंबई** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नगरसेविका विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद अखेर रद्द करण्यात आले आहे. मुंबई महापालिकेच्या महासभेत महापौर रितू तावडे यांनी याबाबतची औपचारिक घोषणा केली. जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.

विशाखा राऊत यांनी ओबीसी महिला राखीव जागेवरून निवडणूक लढवली होती. मात्र, निवडणुकीसाठी त्यांनी सादर केलेल्या कुणबी जातीच्या प्रमाणपत्रावर आक्षेप घेण्यात आला होता. पालघर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने तपासणी केल्यानंतर त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवले.

जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद धोक्यात आले होते. या कारवाईविरोधात त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाकडून त्यांना कोणताही दिलासा मिळाला नाही. त्यामुळे त्यांचे नगरसेवकपद जाणार, हे जवळपास निश्चित झाले होते. यानंतर राज्याच्या नगरविकास विभागानेही यासंदर्भातील प्रक्रिया पूर्ण केली. अखेर मुंबई महापालिकेच्या सभेत महापौर रितू तावडे यांनी विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्द झाल्याची औपचारिक घोषणा केली.

नगरसेवकपद रद्द होण्याबरोबरच विशाखा राऊत यांना पुढील सहा वर्षे निवडणूक लढवण्यासही बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या राजकीय कारकिर्दीला मोठा धक्का बसला आहे.

विशाखा राऊत या दादरमधील वॉर्ड क्रमांक १९१ मधून ओबीसी महिला राखीव जागेवर निवडून आल्या होत्या. या जागेसाठी अत्यंत चुरशीची लढत झाली होती. या निवडणुकीत विशाखा राऊत यांनी शिंदे गटाचे नेते सदा सरवणकर यांच्या कन्या प्रिया सरवणकर यांचा पराभव केला होता. विशाखा राऊत यांना १३,३२६ मते मिळाली होती, तर प्रिया सरवणकर यांना १३,०३९ मते मिळाली होती. म्हणजेच अवघ्या १९७ मतांनी विशाखा राऊत विजयी झाल्या होत्या.

प्रिया सरवणकर यांनी विशाखा राऊत यांच्या जात प्रमाणपत्राच्या वैधतेवर तसेच क्षेत्राधिकारावर आक्षेप घेतला होता. त्यांनी याबाबत संबंधित समितीकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीची दखल घेत जात प्रमाणपत्राची तपासणी करण्यात आली. त्यानंतर हे प्रमाणपत्र अवैध असल्याचे निष्पन्न झाले. या निर्णयानंतर विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद अडचणीत आले होते. या संपूर्ण प्रकरणात विशाखा राऊत यांनी आपल्याविरोधात राजकीय दबाव आणि कटकारस्थान रचण्यात आल्याचा आरोप केला होता. त्यांनी सदा सरवणकर यांच्यावरही जोरदार टीका केली होती.

मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे एकूण ६५ नगरसेवक निवडून आले होते. मात्र, विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्द झाल्यामुळे आता ही संख्या ६४ वर आली आहे. विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्द होणे हा ठाकरे गटासाठी मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. दुसरीकडे या निर्णयाचा राजकीय परिणाम महापालिकेतील पक्षीय संख्याबळावरही होणार आहे.

दरम्यान, मुंबई महापालिकेतील एकूण ७९ नगरसेवकांच्या निवडीला न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. आतापर्यंत पाच नगरसेवकांचे पद रद्द झाल्याची माहिती समोर आली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना चुकीचे किंवा खोटे जात प्रमाणपत्र सादर करणे, संपत्तीची माहिती लपवणे तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीची माहिती लपवणे असे आरोप काही नगरसेवकांवर करण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांच्याविरोधात निवडणूक लढलेल्या उमेदवारांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

दरम्यान, विशाखा राऊत यांच्या नगरसेवकपदाच्या घोषणेदरम्यान मुंबई महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यास झालेला विलंब आणि जेम पोर्टलवरील खरेदीच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी प्रशासनाला धारेवर धरले. यावेळी सभागृहातील वातावरण चांगलेच तापले. सभागृह नेत्यांच्या भूमिकेवर आक्षेप घेताना किशोरी पेडणेकर यांनी, "सभागृह नेत्यांचा मी आदर करते; मात्र ते अंगावर येणार असतील तर हे योग्य नाही," असे म्हटले.

किशोरी पेडणेकर यांच्या आरोपांना सभागृह नेते गणेश खणकर यांनीही प्रत्युत्तर दिले. "नीतिमत्ता आमच्यात शिल्लक आहे. आजही मुंबई पाहत आहे की कोण गोंधळ घालत आहे. आमच्या घरातही आमच्या बहिणी आहेत. दुसरे बोलत असताना ऐकण्याची क्षमता ठेवली पाहिजे," असे खणकर यांनी सुनावले. यानंतर सभागृहातील गोंधळ वाढत असल्याचे पाहून महापौर रितू तावडे यांनी सर्व सदस्यांना कामकाज सुरळीत चालू देण्याचे आवाहन केले. एका विषयावर चार-चार तास चर्चा करू नका. सर्वांना बोलण्याची संधी मिळाली पाहिजे. गोंधळ झाल्यास सभागृहातील अनेक महत्त्वाचे विषय प्रलंबित राहतात, असे महापौरांनी स्पष्ट केले. दरम्यान, विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्द झाल्याने मुंबई महापालिकेतील ठाकरे गटाच्या संख्याबळात घट झाली असून, या निर्णयाचे आगामी काळात महापालिकेच्या राजकारणावर काय परिणाम होतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'रस्त्यांच्या कामात चूक दाखवा, मी नाव बदलेन': नाशिक महापालिका आयुक्तांचे थेट ओपन चॅलेंज

**नाशिक** : शहरातील रस्त्यांच्या दुरावस्थेवरून गेल्या काही दिवसांपासून विरोधकांकडून टीका केली जात आहे. तसेच रस्त्यांच्या कामांच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. असे असतानाच नाशिक महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी आक्षेप घेणाऱ्यांना थेट ओपन चॅलेंज दिले आहे. रस्त्यांच्या कामाच्या दर्जाबाबत चूक दाखवा, मी माझे नाव बदलेन, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरात सुरू असलेल्या रस्ते कामांच्या दर्जाबाबत विरोधक व नागरिकांकडून प्रश्न उपस्थित झाल्यानंतर, महापालिका प्रशासनाने या कामांच्या तांत्रिक तपासणीवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. याच अनुषंगाने महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी त्र्यंबकनाका परिसरातील रस्त्यांच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून बांधकाम पद्धत, वापरलेले साहित्य आणि तांत्रिक निकषांची अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली आणि रस्त्यांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याची स्पष्ट भूमिका मांडली.

नाशिक शहरातील रस्त्यांच्या कामांमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी सध्या चार वेगवेगळ्या संस्थांमार्फत गुणवत्ता तपासणी केली जात असून, विशेषतः काँक्रिट रस्त्यांचा दर्जा तपासण्यासाठी 'आयआयटी मुंबई'च्या तज्ज्ञांनीही प्रत्यक्ष पाहणी केली आहे. या तपासणी मोहिमेअंतर्गत शहरातील त्र्यंबकरोडवरील खडकाळी सिग्नल ते आयटीआय (ITI) सिग्नल, आयटीआय सिग्नल ते पिंपळगाव बहुला आणि गरवारे ते एक्सएल-ओ (XL-O) पॉइंट या तीन प्रमुख काँक्रिट रस्त्यांची तज्ज्ञांकडून कसून पाहणी करण्यात आली.

तज्ज्ञांनी 'कोअर कट' पद्धतीचा अवलंब करून काँक्रिट रस्त्यांच्या प्रत्यक्ष जाडीची आणि तांत्रिक निकषांची सखोल तपासणी केली. महापालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक तपासणीमध्ये रस्त्यांची कामे निर्धारित मानकांनुसार योग्य असल्याचे निष्पन्न झाले असले तरी, यासंबंधीचा अंतिम निष्कर्ष तज्ज्ञांचा सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

रस्त्यांच्या गुणवत्तेबाबत महापालिकेने अत्यंत कठोर भूमिका घेतली असून, कोणत्याही परिस्थितीत कामाच्या दर्जात तडजोड न करण्याचा निर्णय घेतला आहे.

'आयआयटी मुंबई'चा अंतिम तपासणी अहवाल प्राप्त होऊन रस्त्यांची कामे योग्य दर्जाची असल्याची खात्री झाल्यानंतरच संबंधित ठेकेदारांना बिले अदा केली जाणार आहेत. यामुळे प्रशासनाने देयके देण्याची घाई न करता तांत्रिक तपासणी आणि गुणवत्तेलाच सर्वोच्च प्राधान्य दिल्याचे स्पष्ट होते.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशनचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०८ सप्टेंबर २०२६


## जुन्या पेन्शन साठी शिक्षकांचा बीडमध्ये मूक मोर्चा




**शिरूर कासार/बीड :** जुन्या पेन्शन पासून वंचित असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आपल्या पेन्शनच्या हक्कासाठी आणि शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ५ सप्टेंबर 'शिक्षक दिन' या दिवशीच १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करावी.यासाठी बीड येथे शेकडो शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढला आहे.१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर १००% टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षकांनी 'शिक्षक दिन' या दिवशी रस्त्यावर उतरून शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत शासनाच्या निषेधार्थ काढण्यात आलेल्या मूक मोर्चात सहभाग घेऊन जिल्हाधिकारी यांना जुन्या पेन्शनच्या मागणीचे निवेदन देण्यात आले.खरे तर महाराष्ट्र शासनाने शिक्षक-शिक्षकांमध्ये दुजाभाव केला आहे.जे शिक्षक शासकीय सेवेत कार्यरत आहेत अशा शिक्षकांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू केली आहे.तर निमशासकीय सेवेत असणाऱ्या शिक्षकांना मात्र जुन्या पेन्शन पासून वंचित ठेवले आहे.भविष्याच्या दृष्टीने शिक्षकांनी सेवानिवृत्ती झाल्यानंतर उदरनिर्वाहासाठी शासन निवृत्तीवेतन देते.या अटीवर शासकीय सेवेत नोकरी करण्याचे ठरविलेले असते.आणि शासनाच्या नियमानुसार पेन्शन हा कर्मचाऱ्यांचा हक्क असतो.परंतु सध्याच्या शासनाने अनावश्यक व क्लिष्ट नियमावली लागू करून,विविध कारणे सांगून आणि नव-नवे पर्याय देऊन कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन देण्यासाठी शासन टाळाटाळ करत आहे.यासाठी महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यात विविध शिक्षक संघटनांनी शासनाच्या निषेधार्थ 'पाच सप्टेंबर-शिक्षक दिनी' मूक मोर्चा काढून जुनी पेन्शन तात्काळ लागू करावी अशी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.जुन्या पेन्शनची मागणी मंजूर नाही झाल्यास जुनी पेन्शन पीडित सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर बांधवांनी दि.२८ सप्टेंबर पासून मुंबई येथील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण व आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## शिक्षक दिनानिमित्त प्राचार्य डॉ. सुशील बोर्डे यांच्या तीन पुस्तकांचे विमोचन



**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षक दिनाच्या शुभमुहूर्तावर ग्रामीण लोककल्याण शिक्षण संस्थेच्या महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्राचार्य डॉ. सुशील बोर्डे यांनी लिहिलेल्या 'शैक्षणिक तंत्रज्ञान व व्यवस्थापन', 'शालेय सामाजिक कार्य' आणि 'पर्यावरण शिक्षण' या तीन पुस्तकांचे विमोचन करण्यात आले.ग्रामीण लोककल्याण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सतीश सुराणा यांच्या शुभहस्ते या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य डॉ. समाधान दांडगे उपस्थित होते.प्राचार्य डॉ. सुशील बोर्डे यांनी शैक्षणिक क्षेत्रातील बदलती आव्हाने, आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञान, शालेय व्यवस्थापन, विद्यार्थ्यांच्या सामाजिक व भावनिक गरजा तसेच पर्यावरण संवर्धन यांचा विचार करून या तीन पुस्तकांची निर्मिती केली आहे. शिक्षक, प्रशिक्षणार्थी आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित व्यक्तींसाठी ही पुस्तके मार्गदर्शक व उपयुक्त ठरणार असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी नमूद केले.कार्यक्रमास संस्थेतील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच बी.एड. प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याशिवाय यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एम.ए. एज्युकेशन, शालेय व्यवस्थापन, बाल संगोपन व रंजन शिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणार्थींनीही कार्यक्रमास उत्स्फूर्त उपस्थिती नोंदविली.शिक्षक दिनाच्या निमित्ताने एका शिक्षक-प्राचार्याने शैक्षणिक क्षेत्रासाठी तीन दर्जेदार पुस्तके लिहून त्यांचे प्रकाशन करणे ही बाब शिक्षण क्षेत्रासाठी निश्चितच प्रेरणादायी असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. पुस्तक प्रकाशनाच्या या उपक्रमामुळे शिक्षक दिनाचा कार्यक्रम अधिक अर्थपूर्ण व संस्मरणीय ठरला.

## छत्रपती संभाजीनगर येथील तिफण ट्रेकिंग ग्रुपची ब्रह्मगिरी परिक्रमा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** छत्रपती संभाजीनगर येथील तिफण ट्रेकिंग ग्रुपच्या वतीने ब्रह्मगिरी पर्वताच्या परिक्रमेचे आयोजन करण्यात आले होते. दि. ७ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजता सुरू झालेली ही परिक्रमा सकाळी ८ वाजता पूर्ण झाली. ८ तासांचा हा ट्रेक होता.ब्रह्मगिरी हा पश्चिम घाटाचा महत्त्वाचा भाग असून गोदावरी नदीचा जलस्तंभ आहे. केवळ धार्मिक नव्हे, तर निसर्ग, पर्यावरण आणि जलचक्र समजून घेण्याच्या उद्देशाने ही परिक्रमा करण्यात आली.या परिक्रमेत भातशेतीतील शाश्वत शेती, आदिवासी वस्त्यांमधील निसर्गाशी एकरूप जीवन, ओढ्यांचे अर्थशास्त्र आणि ढगात हरवलेल्या पठाराचा अनुभव घेण्यात आला. जंगल हेच खरे धरण आहे, हा संदेश यातून देण्यात आला.परिक्रमा दरम्यान पर्यावरणपूरक नियमांचे पालन करण्यात आले.सहभागी सदस्य - प्रतिभा ताठे, सोमनाथ ताठे, वैशाली कापडे, विलास कापडे, उर्मिला हुसे, डॉ. शिवाजी हुसे, कल्पना पाले, सविता ताठे, संगीता नागरे, अनिल ताठे, भारती ताठे, अनुसूया मुगले, सुभाष ताठे, अण्णा ताठे, विद्या ताठे आणि योगेश्वरी मुंढे असे एकूण १६ जण सहभागी झाले होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०८ सप्टेंबर २०२६


## जाधव हॉस्पिटल कन्नड इथे गॅस्ट्रोस्कॉपी शिबिर संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** शहरातील प्रसिद्ध जाधव नर्सिंगहोम अँड आयसीयू सेंटर येथे छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध पोट विकार तज्ञ डॉ.राहुल तळेले यांच्या माध्यमातून कन्नड शहरात इंडॉस्कॉपी अँड फायब्रो स्कॅन तपासणी शिबिर दि.६ सप्टेंबर रोजी संपन्न झाली. संभाजीनगर येथील गॅस्ट्रो केअर हॉस्पिटल चे डॉ. राहुल तळेले यांनी कन्नड तालुक्यात प्रथमच अशी शिबिर च आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये पोट, यकृत (लिव्हर),अपचन, छातीमध्ये जळजळ, कावीळ, स्वादुपिंड, दारूमुळे होणारे लिव्हरचे विकार इत्यादी रोगाच्या तपासणी केली या शिबिरामध्ये १३२ लोकांनी सहभाग नोंदवला तर ५५ रुग्णांचे इंडोस्कोपी तपासणी सवलतीच्या दरात तपासणी करण्यात आले. लिव्हरच्या आजारासाठी अत्याधुनिक फायब्रोस्कॅन करण्यात आला. या शिबिराचे उद्घाटन कन्नड शहर पोलीस स्टेशनचे पोलीस सहा.निरीक्षक सतीश दिंडे यांच्या हस्ते संपन्न झाला याप्रसंगी कृषीभूषण डॉ. एस जे. जाधव इंडॉस्कॉपीक सर्जन डॉ. राहुल तळेले, रेडीलॉजिस्ट डॉ. रविराज जाधव, जाधव हॉस्पिटलचे व्यवस्थापक डॉ. सदाशिव पाटील, स्त्रीरोगतज्ञ डॉ. अयाज उजाडे, हृदयरोग व मधुमेह तज्ञ डॉ. उत्कर्ष मुंडे, डॉ विलास पाटील, डॉ. उमेश दहेतकर, डॉ गोपाल पाचोरे, हे उपस्थित होते.

शिबीर यशस्वितेसाठी विकास हाटकर, सचिन गिरे, योगेश आहेर, विकास खाजेकर, तोफिक बागवान, कैलास राठोड इत्यादी लोकाने पुढाकार घेतला

## अखंड हरिनाम सप्ताह निमित्त औराळा प्रा आरोग्य केंद्राकडून महाआरोग्य शिबिर



**हसनखेडा (ता.कन्नड) :** येथे प्रा आ केंद्र औराळा तसेच जय हिंद फाऊंडेशन च्या वतीने भव्य अखंड हरिनाम सप्ताह निमित्त सोमवारी (ता.०७) रोजी महाआरोग्य शिबिर व नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी ३०० पेक्षा जास्त रुग्णांची आरोग्य तपासणी करून सर्व रुग्णांना मोफत औषधे देण्यात आली. यावेळी नेत्र तपासणी मधे १५ रुग्णांना मोतीबिंदू निदान निघाले असून,त्यांची येत्या १५ दिवसात लायन्स आय हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.यावेळी आरोग्यवर्धिनी केंद्र औराळा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ प्रतीक्षा राजपूत, समुदाय आरोग्य अधिकारी अक्रम शेख श्रद्धा भोसले श्रीमती बकले, निर्मला चव्हाण कृष्णा चौधरी, वसंत चौधरी रमेश रहाणे दीपक पवार सोनवणे अक्षय चव्हाण यांच्यासह कर्मचारी, लायन्स आय हॉस्पिटल छत्रपति संभाजीनगर येथील डॉ. गायकवाड यांच्यासह कर्मचारी व जय हिंद फाऊंडेशन मधील सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## तालुकास्तरीय बॅडमिंटन व बुद्धिबळ स्पर्धेत उत्साहात प्रारंभ



**कन्नड :** बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त तालुकास्तरीय बॅडमिंटन व बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे करण्यात आले आहे. बाबुरावजी औराळकर क्रीडा संकुल मध्ये बाबुरावजी औराळकर यांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करण्यात आली त्यानंतर मेजर ध्यानचंद व बाळासाहेब पवार यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या हस्ते संपन्न झाले, याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, लेफ्टनंट डॉ. विजय मातकर, श्री बाबुराव काळे, बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाचे सचिव श्री आर. के. पवार, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उदय डोंगरे, तालुका संयोजक मुक्तानंद गोस्वामी, श्याम खोसरे, प्रवीण शिंदे, राकेश निकम, राहुल धनके, कधुबा चव्हाण, अजित खंबाट, विकेश कामठीकर, सतीश गडकरी व अमोल कदम आदींची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्र शासनाचा आदर्श प्राचार्य पुरस्कार डॉ. विजय भोसले यांना मिळाल्याबद्दल सर्व क्रीडा शिक्षकांच्या वतीने प्राचार्य डॉ. विजय भोसले यांचा विशेष सत्कार करण्यात आला तसेच शिवाजी महाविद्यालयाचे माजी खेळाडू राहुल दणके यांची रयत शिक्षण संस्थेमध्ये क्रीडा शिक्षक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. या स्पर्धेत देवगिरी इंग्लिश स्कूल, फातिमा कॉन्व्हेंट स्कूल, साने गुरुजी माध्यमिक शाळा, जवाहर नवोदय विद्यालय ,मदर गंगा इंग्लिश स्कूल ,गौताळा व्हॅली स्कूल ,ऍनी स्मार्ट स्कूल ,जिल्हा परिषद बहिरगाव आदी शाळा महाविद्यालयांचे 232 खेळाडू सहभागी झाले. बॅडमिंटन स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी राहुल दणके, मुकेश राठोड, ऋषिकेश पांचाळ, कृष्णा गवळी, अदनान पठाण व अमोल गंगावणे आदींनी पंच म्हणून काम पाहिले. बुद्धिबळ स्पर्धा दिनांक 8 सप्टेंबर रोजी सकाळी ठीक नऊ वाजता सुरू होणार आहेत सर्व खेळाडू शिक्षक व पालकांनी याची नोंद घ्यावी. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉक्टर उदय डोंगरे यांनी केले सूत्रसंचालन श्री राहुल दणके यांनी तर आभार विशाल दांडेकर यांनी मानले.बॅडमिंटन स्पर्धेचे अंतिम निकाल पुढीलप्रमाणे.14 वर्षे मुली 1)प्रथम- शुभदा रोहन शिंदे- जवाहर नवोदय विद्यालय कन्नड 2)द्वितीय- प्रणिका हेमंत केरे- जवाहर नवोदय विद्यालय कन्नड3)तृतीय- विद्या रमेश बनकर- जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव 17 वर्ष मुली1)प्रथम-सई राजकुमार शिरसागर- गौताळा व्हॅली स्कूल कन्नड2)द्वितीय-संचिता सचिन वारेगावकर- देवगिरी इंग्लिश स्कूल कन्नड 3)तृतीय- श्रेया गणेश रिंडे - गौताळा व्हॅली स्कूल कन्नड 19 वर्ष मुली1)प्रथम- वेदिका कैलास बागुल-जवाहर नवोदय विद्यालय कन्नड 2)द्वितीय- प्रणिता प्रमोद हिवाळे- जवाहर नवोदय विद्यालय कन्नड 3)तृतीय- अनुजा बाबासाहेब हुमे -जवाहर नवोदय विद्यालय कन्नड.14 वर्ष मुले1)प्रथम- व्यंकटेश सुनील वाकळे- फातिमा कॉन्व्हेंट कन्नड 2) द्वितीय-आदित्य माधव जाधव- जवाहर नवोदय विद्यालय कन्नड 3) तृतीय-राज कारभारी वाघ-जवाहर नवोदय विद्यालय कन्नड17वर्षे मुले 1)प्रथम- राज दीपक ताठे-गौताळ व्हॅली स्कूल कन्नड 2) द्वितीय- मीत विजय कांकरिया-गौताळा व्हॅली स्कूल कन्नड 3)तृतीय- क्षितिज दिनेश राठोड -गौताळा व्हॅली स्कूल कन्नड 19 वर्ष मुले1) प्रथम-ऋषिकेश दादासाहेब पांचाळ- शिवाजी महाविद्यालय कन्नड 2)द्वितीय- हर्ष दिवाकर सिडाम -जवाहर नवोदय विद्यालय कन्नड 3)तृतीय- आर्यन सुरेश जांबुतकर - चंपावती विद्यालय चापानेर


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०८ सप्टेंबर २०२६


## समाजाला त्रासदायक ठरणाऱ्या धार्मिक व सांस्कृतिक मिरवणुकांचा विचार करण्याची वेळ

**मि**त्रांनो, तरुणांनो, भारतीय संस्कृती जपण्याचा प्रयत्न करणाऱ्या बांधवानो आपण आज जरा वेगळ्या चिंतनासाठी आपण हा लेख वाचणार आहात. धर्म आणि संस्कृती हे मानवी जीवनाला दिशा देणारे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. धर्म माणसाला संयम, सदाचार, करुणा, सहिष्णुता आणि परस्पर सन्मान शिकवतो; तर संस्कृती माणसाच्या जीवनपद्धतीला मूल्य, परंपरा आणि सामाजिक बांधिलकीची जोड देते. त्यामुळे धर्म आणि संस्कृतीचे संवर्धन हे समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे.मात्र, आज काही धार्मिक आणि सांस्कृतिक मिरवणुकांचे स्वरूप पाहिले तर त्यांच्या मूळ उद्देशाचा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. धर्माच्या नावाखाली होणारा भपकेबाजपणा, मोठ्या आवाजातील डीजे, रस्ते अडविणे, अवाजवी घोषणाबाजी, अंगविक्षेप, शक्तीप्रदर्शन आणि सामूहिक शक्तीचा गैरवापर यामुळे धर्म व संस्कृतीचा गौरव वाढण्याऐवजी त्यांच्याबद्दल नकारात्मक भावना निर्माण होण्याची शक्यता असते.मिरवणूक ही आनंद, श्रद्धा आणि सामाजिक एकतेचे प्रतीक असू शकते. मात्र, त्या मिरवणुकीमुळे रुग्णवाहिका अडकत असेल, विद्यार्थ्यांना त्रास होत असेल, वृद्ध व लहान मुलांना मोठ्या आवाजाचा त्रास होत असेल किंवा नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अडथळे निर्माण होत असतील, तर आपण स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा आपल्या धार्मिक आनंदाची किंमत इतर नागरिकांनी का मोजावी?शक्तीप्रदर्शन म्हणजे धर्माची ताकद नव्हे धर्माची ताकद ही मोठ्या आवाजात नसते; ती विचारांच्या उंचीत असते. संस्कृतीची ओळख ही भपकेदार सजावटीत नसून तिच्या मूल्यांमध्ये असते.आपली सांघिक शक्ती जर समाजहितासाठी वापरली तर ती परिवर्तनाची ताकद बनते. रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, जलसंधारण, गरजू विद्यार्थ्यांना मदत, रुग्णांना सहकार्य, स्वच्छता अभियान, व्यसनमुक्ती आणि पर्यावरण संवर्धन अशा उपक्रमांतून धार्मिक व सामाजिक एकतेची खरी ताकद दिसून येते.परंतु हीच शक्ती इतरांना त्रास देण्यासाठी, आवाजाचा अतिरेक करण्यासाठी किंवा रस्ते अडविण्यासाठी वापरली गेली तर त्या शक्तीचे रूपांतर सामाजिक अस्वस्थतेत होऊ शकते. भपकेबाज घोषणा कशासाठी?घोषणा या विचार जागवण्यासाठी असतात; वातावरण दूषित करण्यासाठी नव्हे. न पचणारे, न रुचणारे किंवा इतरांच्या श्रद्धेला दुखावणारे शब्द वापरून केलेली घोषणाबाजी कोणत्याही धर्माची प्रतिष्ठा वाढवत नाही.आपल्या धर्माचा गौरव करण्यासाठी दुसऱ्या धर्माचा अवमान करण्याची गरज नसते. आपला धर्म मोठा आहे हे सिद्ध करण्यासाठी दुसऱ्याला लहान करण्याची आवश्यकता नाही. खरा धर्म माणसाला जोडतो, तोडत नाही.संस्कृतीचे संवर्धन की संस्कृतीची घसरण?संस्कृती जपण्याच्या नावाखाली जर आपण तिच्या मूलभूत मूल्यांनाच विसरत असू, तर आपण संस्कृतीचे संवर्धन करीत आहोत की तिची घसरण घडवत आहोत, याचा विचार करणे आवश्यक आहे.आपल्या पूर्वजांनी निर्माण केलेल्या परंपरांमध्ये संयम, शिस्त, सामूहिकता, निसर्गाशी नाते आणि सामाजिक बांधिलकी होती. आज त्या परंपरांना केवळ आवाज, प्रकाश, पैसा आणि गर्दीच्या प्रदर्शनात मर्यादित करणे योग्य आहे का?धर्माचा, संस्कृतीचा उत्सव हा समाजासाठी आनंदाचा असावा, त्रासाचा नव्हे.मिरवणूक ही संस्कृतीचे दर्शन घडवणारी असावी, दहशतीचे नव्हे.सामूहिक शक्ती ही समाज उभारण्यासाठी असावी, शक्तीप्रदर्शनासाठी नव्हे.बदलाची सुरवात आपल्यापासूनधार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये शिस्त, वेळेचे भान, ध्वनीप्रदूषणाबाबत संवेदनशीलता, वाहतुकीचा विचार आणि सर्व नागरिकांच्या अधिकारांचा सन्मान राखला पाहिजे.मिरवणुकीत डीजेचा आवाज कमी करून पारंपरिक वाद्यांना प्रोत्साहन देता येईल का याचाही विचार करावा.अनावश्यक खर्च कमी करून त्यातील काही रक्कम सामाजिक कार्यासाठी वापरता येईल. रस्ते अडवण्याऐवजी प्रशासनाशी समन्वय साधून नियोजन करता येईल. घोषणांमध्ये द्वेषाऐवजी बंधुभावाचा संदेश देता येईल.यातूनच धर्म आणि संस्कृती समाजाच्या विकासाचे साधन बनतील.शेवटी.धर्म हा माणसासाठी आहे आणि संस्कृती ही समाजाला समृद्ध करण्यासाठी आहे. ज्यातून दुसऱ्याला त्रास होतो, त्याचा पुनर्विचार करण्याची नैतिक जबाबदारी प्रत्येक श्रद्धावान नागरिकाची आहे.आपल्या श्रद्धेचा आवाज मोठा करण्यापेक्षा आपल्या आचरणाचा आदर्श मोठा करणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण समाजावर सर्वाधिक परिणाम हा आपल्या घोषणांचा नव्हे, तर आपल्या कृतींचा होत असतो.धर्म वाढवायचा असेल तर माणुसकी वाढवा.संस्कृती जपायची असेल तर संस्कार जपा.

सामूहिक शक्ती दाखवायची असेल तर समाजहिताचे कार्य करा. आणि उत्सव साजरा करायचा असेल तर तो सर्वांच्या आनंदाचा करा.हीच खरी धार्मिक सहिष्णुता, हीच खरी सांस्कृतिक समृद्धी आणि हाच आधुनिक, संवेदनशील समाजाचा मार्ग आहे.

**चिंतन : भूमिपुत्र वाघ**

## बायको

बायको म्हणजे असतेच,
सदा संकटात सावरणारी.
अडचणीच्या काळामध्ये,
कोणालाही न घाबरणारी. १

जीवनात जगतांना सदा,
संकटात काळजी घेणारी,
संकटांशी सामना करतांना,
तोलामोलाची साथ देणारी. २

घरदार सावरता सावरता,
मुला बाळांना संस्कार देते.
सुख असो की दुःख असो,
सदा सर्वांची काळजी घेते. ३

सौभाग्याचे मळवट भरून,
नित्य कुटुंबासाठी राबते.
कुटुंबाच्या कल्याणासाठी,
सदा सर्वदा आनंदाने धावते. ४

बायको असते घरामध्ये,
सर्वांच्या इच्छा जाणणारी.
सर्वांच्या इच्छा पूर्ण करताना,
निस्वार्थ अविरत धावणारी. ५

धाव धाव धावतांना कधीच,
न थकणारी मुलांची आई.
सर्वांना सर्व मिळावे म्हणून,
सुरूच असते तिची सदैव घाई. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं. ८८३०६३५६९१**

## तुका अंतर्यामी

तुका अंतर्यामी
बैसला विमानी
फैसला करुनी
जगाचिया

वेदांचे ते सार
गाथेत लिहून
लेकरा देऊन
निघालाया

उपकारा जगा
अवतार तुका
पांडुरंग सखा
तुका माझा

शब्दांचे ते धन
फुकट वाटून
जीवन अर्पण
विठ्ठलाशी

रात्र दिन जरी
युद्धाचा प्रसंग
आनंद तरंग
सोबतीला

अभंगाच्या ओळी
जशा ज्ञानज्योती
वाटा उजळती
आयुष्याच्या

देहूच्या मातीत
इंद्रायणी तिरी
जन्माची रे वारी
सरलीया



**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड


### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


# जिंतूर तालुक्यात ३० ते ४० मेंढ्यांचा अचानक मृत्यु

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील वडाळी गाव परिसरात मुक्कामी असलेल्या एका मेंढपाळाच्या कळपातील तब्बल 30 ते 40 मेंढ्यांचा अचानक मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एकाच वेळी मोठ्या संख्येने मेंढ्या दगावल्याने संबंधित मेंढपाळाचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, बुलढाणा जिल्ह्यातील एक मेंढपाळ आपल्या कुटुंबासह 200 हून अधिक शेळ्या-मेंढ्यांचा कळप घेऊन जिंतूर तालुक्यातील वडाळी परिसरात मुक्कामासाठी आला होता. परिसरात मेंढ्या चारल्यानंतर काही मेंढ्यांची प्रकृती अचानक बिघडल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर अल्पावधीतच मोठ्या संख्येने मेंढ्यांचा मृत्यू झाला.या घटनेमुळे मेंढपाळ कुटुंबावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. शेळी-मेंढी पालन हा या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख व्यवसाय असल्याने झालेल्या नुकसानीमुळे त्यांच्या पुढील उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे.मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्टमेंढ्यांचा मृत्यू नेमका कोणत्या कारणामुळे झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. विषबाधा, दूषित चारा किंवा पाण्यामुळे झालेली बाधा अथवा एखादा तीव्र संसर्गजन्य आजार यापैकी कोणते कारण आहे, याबाबत विविध शक्यता व्यक्त करण्यात येत आहेत. मात्र अधिकृत वैद्यकीय तपासणी व अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.घटनेची माहिती मिळताच स्थानिक पशुसंवर्धन विभागाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी व तपासणी सुरू केली आहे. मृत मेंढ्यांची वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यक नमुने घेण्यात येत असून, अहवालानंतर या घटनेमागील नेमके कारण समोर येण्याची शक्यता आहे.उर्वरित कळपाच्या आरोग्याची चिंताएकाच ठिकाणी मोठ्या संख्येने मेंढ्यांचा मृत्यू झाल्याने उर्वरित कळपातील शेळ्या-मेंढ्यांच्या आरोग्याबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. संभाव्य संसर्ग किंवा विषबाधा असल्यास त्याचा इतर जनावरांवर परिणाम होऊ नये, यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून आवश्यक खबरदारी घेणे गरजेचे आहे.शासनाकडून तातडीच्या मदतीची मागणीमेंढपाळांसाठी शेळ्या-मेंढ्या ही केवळ जनावरे नसून त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहेत. त्यामुळे अचानक झालेल्या या मोठ्या नुकसानीमुळे संबंधित मेंढपाळ कुटुंब आर्थिक अडचणीत सापडले आहे.शासनाने घटनेची गांभीर्याने दखल घेऊन नुकसानग्रस्त मेंढपाळाच्या जनावरांची पंचनामा प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, मृत मेंढ्यांची संख्या निश्चित करावी आणि नियमानुसार आर्थिक नुकसानभरपाई उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी परिसरातून होत आहे.

दरम्यान, मेंढ्यांच्या मृत्यूचे अधिकृत कारण वैद्यकीय तपासणीच्या अहवालानंतरच स्पष्ट होणार असल्याने पशुपालकांनीही खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०८ सप्टेंबर २०२६


## श्रीराम गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी नगरसेवक श्रीराम कुलकर्णी यांची निवड



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यातील मुरूम येथील श्रीराम गणेश मंडळाची गणेशोत्सव २०२६ साठी बैठक आयोजित करण्यात आली होती यामध्ये नगरसेवक श्रीराम कुलकर्णी यांची अध्यक्षपदी, पुष्पक कौलकर याची उपाध्यक्षपदी तर सचिवपदी अभिजित कुलकर्णी यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आले.शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या सोनार गल्ली येथील श्रीराम गणेश मंडळाची नुकतेच सोनार गल्ली येथील माऊली भक्त आश्रम येथे गणेशोत्सव २०२६ संबंधित बैठीकीचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये गणेशोत्सव २०२६ कार्यक्रमांची रूपरेषा व पदाधिकारी निवड करण्यात आले यामध्ये अध्यक्षपदी मुरूम नगर पालिका नगरसेवक श्रीराम कुलकर्णी यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली, उपाध्यक्ष म्हणून पुष्पक कौलकर तर सचिव म्हणून अभिजित कुलकर्णी यांचे सर्वानुमते निवड करण्यात आले व गणेशोत्सव २०२६ विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक कार्यक्रमाने साजरा करण्याचे ठरवण्यात आले.

याबैठकिला माजी अध्यक्ष सागर पोतदार, गोविंद कौलकर, सतीश वेदपाठक, राजु खुने, महादेव महामुनी, प्रवीण पंडित, निलेश महामुनी, अमोल वेदपाठक, अमित पोतदार, आशिष वेदपाठक, प्रसाद महामुनी, समर्थ कडगांचे, शिवराज बोळशेठे, गौरी बोगंरगे, सागर शिंदे,ईश्वर कडगांचे, किशोर महामुनी, राजू दीक्षित, योगेश पोतदार, संकेत पंडित, अप्पू कोळी, राहुल विभुते, रुद्र वेदपाठक, यांच्यासह मंडळाचे इतर कार्यकर्ते उपस्थित होते..

## धनगर समाजाची आरक्षणाची अंमलबजावणी करण्याची निवेदनाद्वारे मागणी

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** धनगर समाजाची अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करावी तसेच श्री संत बाळूमामा देवस्थानासाठी स्वतंत्र कायदा करावा व अन्य मागण्यासाठी सकल धनगर समाज जिंतूर तर्फे तहसीलदार शितल कच्छवे यांना निवेदन देण्यात आले. धनगर समाजाच्या हक्कासाठी राज्यव्यापी आंदोलन करण्यात येत आहे. आमदार गोपीचंद पडळकर व धनगर समाज विचारमंच च्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रभर राज्यव्यापी आक्रोश आंदोलन करण्यात आले आहे. त्यानुसार तहसीलदार यांचे द्वारा मुख्यमंत्री यांना धनगर एस.टी. आरक्षण अ मलबजावणीचे निवेदन सकल धनगर समाजतर्फे देण्यात आले. निवेदनात शासनाने सर्वोच्च न्यायालयातील लढाई पूर्ण ताकदीने लढावी आणि निर्णय प्रतिकूल झाल्यास आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी सरकारने ठोस प्लॅन बी तयार ठेवावा, संत बाळूमामा देवस्थानासाठी स्वतंत्र कायदा करून ऐक्केवीस विश्वस्तापैकी किमान अकरा विश्वस्त अस्सल मेंडपाळ समाजातील असावेत आणि अध्यक्षही मेंढपाळ समाजातील असावा, मुंबई पुणे एक्सप्रेस वे वरील नवीन कनेक्टिंग लिंक ला हुतात्मावीर सिंगरोबा धनगर यांचे नाव देण्यात यावे त्याचबरोबर पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर हे नाव मुंबईतील चर्चगेटला देण्यात यावे इत्यादी मागण्यांचा समावेश आहे. निवेदनावर सकल धनगर समाजतर्फे गजानन वऱ्हाड, प्रा. डॉ. प्रभाकर वजीर, ज्ञानेश्वर मार्कड, ओंकार पुंजारे, गजानन श्रावणे यांचे सह गजानन शेवाळे, प्रदीप पुंजारे,गोपाळ आव्हाड, दीपक शेवाळे, नवनाथ शेवाळे, सुनील वैद्य, तुकाराम शेवाळे, अविनाश पुंजारे, बालाजी शेवाळे, चंद्रकांत पुंजारे, नंदकुमार वैद्य, राहुल पुंजारे, बालाजी पुंजारे, आकाश पुंजारे,बालासाहेब गलांडे, शेवाळे, विशाल ढोले, गोविंद पुंजारे,सिताराम पुंजारे,राम शेवाळे, श्रीधर शेवाळे, आश्रोबा पुंजारे, शिवानंद पुंजारे, ज्ञानेश्वर आव्हाड, राजू देवकते, ऋषिकेश मुधवर, ज्ञानदेव पुंजारे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002**


## अनिष्ट रूढी परंपरेला बाजूला सारून खोबरे कुटुंबियाणी रक्षा पाण्यामध्ये विसर्जित न करता स्मृती जागवण्यासाठी केले वृक्षारोपण



**धाराशिव :** जिल्ह्यातील येडशी या गावी जन्म झालेले संजय शिवाजी खोबरे यांचे तीन तारखेला देहावसन झाले. त्यांची रक्षा कोणत्याही नदीत विसर्जित न करता सामाजिक बदलाची नांदी आणि स्मृती जतन करण्यासाठी रक्षा शेतामध्ये विसर्जित करून त्यावरती चिक्कू आंबा जातीची रोपे लावून केल्या अस्थी विसर्जित.कै.संजय खोबरे यांच्या स्मृती जतन करणारा समाज परिवर्तनाचा पायंडा खोबरे कुटुंबीयांनी स्वीकारला. तीन तारखेला अल्पशा आजाराने संजय खोबरे यांचे निधन झाले. त्यांनी सोलापूर जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी ग्रामसेवक या पदावर राहून कार्य केले. समाजाची सेवा करता करता परिवर्तनाचा विचार स्वीकारून सामाजिक कार्यामध्ये त्याचं खूप मोठं योगदान होतं. गाव विकास आणि शेतकऱ्यांच्या मदतीची त्यांनी विविध प्रकारची काम केली.खरं तर कुटुंबातल्या सर्व सदस्यांनी कुटुंबावर कोसळलेला दु:खाचा डोंगर सावरीत सामाजिक बदलाच्या उपक्रमाला पाठिंबा देऊन त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी येडशी या वडीलोपार्जित जमिनीमध्ये आंबा,चिक्कू या जातीची रोपे लावून सामाजिक बदलाचा आदर्श समाजासमोर ठेवला. सामाजिक कार्यकर्ते भूमिपुत्र वाघ यांनी या कार्याचं केलं कौतुक.समाजामध्ये वाईट चालीरीती आणि परंपरा ज्या सामाजिक बदलाच्या आडसर ठरतात, त्या बाजूला सारून जलसंवर्धन, वृक्ष संवर्धन मानवी मूल्य जतन आणि संवर्धनासाठी विविध विचार घेऊन रक्षा ही पान्यात विसर्जित करायची नसते तर ती जतनच करायची असते हा विचार घेऊन त्यांनी वृक्ष लावून अस्थी विसर्जित केल्या. हा सामाजिक बदलाचा विचार, निसर्ग जतन करणारा विचार घेऊन केलेल्या कार्याचं कौतुक वाघ यांनी केले. अग्निसंस्काराच्या वेळी आत्म्यास चिरशांती लाभो यासाठी निसर्गातील सर्व शक्तींना प्रार्थना करण्यात आली.यावेळी, महाराष्ट्र लोकविकास मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष विश्वनाथ (अण्णा) तोडकर,जनविकास सामाजिक संस्थेचे प्रमुख रमेश भिसे, यांनी शोक संदेश पाठवून श्रद्धांजली वाहिली.तसेच सोलापूर जिल्ह्यातील ग्रामसेवक संघटनेचे पदाधिकारी यांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.यावेळी परिसरातील नातेवाईक आप्तेष्ट मित्रगन या शोक सभेला उपस्थित होते...




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०८ सप्टेंबर २०२६

# साक्षरता : विकासाच्या प्रत्येक दाराची किल्ली

माणसाच्या हातात लेखणी आली आणि त्याने आपल्या अनुभवांना शब्दबद्ध करण्यास सुरुवात केली, तेव्हापासून मानवी संस्कृतीच्या विकासाला नवी दिशा मिळाली. पिढ्यान्‌पिढ्या मिळविलेले ज्ञान जतन करणे, अनुभवांची देवाणघेवाण करणे, विचार व्यक्त करणे आणि पुढील पिढीला ज्ञान हस्तांतरित करणे यासाठी अक्षरांचे सामर्थ्य मानवाने ओळखले. म्हणूनच साक्षरता ही केवळ वाचता-लिहिता येण्याची क्षमता नसून मानवी सभ्यतेच्या प्रगतीचा पाया आहे. अक्षरज्ञानामुळे माणूस माहितीच्या जगाशी जोडला जातो; परंतु माहितीचे आकलन, तिचे परीक्षण, योग्य निर्णयक्षमता आणि ज्ञानाचा जीवनात उपयोग करण्याची क्षमता विकसित झाली की साक्षरतेला खरा अर्थ प्राप्त होतो. ८ सप्टेंबर रोजी साजरा केला जाणारा जागतिक साक्षरता दिन याच व्यापक जाणिवेचा जागतिक संदेश देतो. प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाची समान संधी मिळावी, निरक्षरतेमुळे निर्माण होणारे सामाजिक आणि आर्थिक अडथळे दूर व्हावेत आणि ज्ञानाच्या माध्यमातून व्यक्ती अधिक स्वावलंबी, सजग व सक्षम व्हावी, हा या दिनाचा मूलभूत हेतू आहे.जागतिक साक्षरता दिनाची संकल्पना साक्षरतेला मानवी विकासाच्या केंद्रस्थानी आणण्याच्या प्रयत्नातून पुढे आली. ८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन म्हणून निश्चित करण्यात आला आणि त्यानंतर जगभरात साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी विविध उपक्रम सुरू झाले. निरक्षरतेचा प्रश्न केवळ शिक्षणाच्या क्षेत्रापुरता मर्यादित नसतो. निरक्षर व्यक्तीला अनेकदा रोजगाराच्या संधींपासून, आर्थिक व्यवहारांपासून, शासकीय योजनांच्या लाभापासून आणि सामाजिक निर्णयप्रक्रियेतील सहभागापासून दूर राहावे लागते. त्यामुळे साक्षरता ही व्यक्तीच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय सक्षमीकरणाशी संबंधित आहे. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीला स्वतःच्या जीवनावर अधिक नियंत्रण मिळते आणि परावलंबित्व कमी होते. म्हणूनच साक्षरता ही मानवी प्रतिष्ठेचा आणि सामाजिक न्यायाचा महत्त्वाचा आधार मानला पाहिजे.निरक्षर व्यक्तीच्या जीवनातील अडचणी अनेकदा आपल्या लक्षात येत नाहीत. एखाद्या शासकीय कार्यालयात अर्ज भरताना दुसऱ्याची मदत घ्यावी लागणे, बँकेत व्यवहार करताना कागदपत्रांवर काय लिहिले आहे हे समजत नसणे, औषधांच्या वापराच्या सूचना वाचता न येणे, सार्वजनिक वाहतुकीवरील सूचना समजण्यात अडचण येणे किंवा स्वतःच्या हक्कांशी संबंधित माहिती वाचता न येणे या गोष्टी व्यक्तीच्या स्वावलंबनावर मर्यादा आणतात. साक्षर झाल्यानंतर मात्र हीच व्यक्ती स्वतः माहिती वाचू शकते, प्रश्न विचारू शकते आणि स्वतःच्या निर्णयांवर विश्वास ठेवू शकते. म्हणून साक्षरता म्हणजे केवळ अक्षर ओळखणे नव्हे, तर स्वतःच्या जीवनातील निर्णय स्वतः घेण्याची क्षमता विकसित करणे होय.भारताच्या संदर्भात साक्षरतेचा प्रश्न अधिक व्यापक आहे. विविध भाषा, संस्कृती, भौगोलिक प्रदेश, सामाजिक स्तर आणि आर्थिक परिस्थिती असलेल्या भारतात शिक्षणाच्या संधी सर्वांपर्यंत समान प्रमाणात पोहोचविणे हे मोठे आव्हान राहिले आहे. स्वातंत्र्याच्या वेळी निरक्षरतेचे प्रमाण मोठे होते. ग्रामीण भाग, दुर्गम प्रदेश, महिला, आदिवासी समाज, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि सामाजिकदृष्ट्या वंचित समूह यांच्यासाठी शिक्षणाच्या संधी मर्यादित होत्या. स्वातंत्र्यानंतर शासनाने शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी अनेक योजना आणि कार्यक्रम राबविले. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, प्रौढ साक्षरता, सर्वसमावेशक शिक्षण आणि शिक्षणाच्या अधिकाराच्या माध्यमातून समाजातील अधिकाधिक घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रयत्नांमुळे साक्षरतेच्या क्षेत्रात प्रगती झाली असली तरी शिक्षणाची गुणवत्ता आणि समान उपलब्धता हा प्रश्न अजूनही महत्त्वाचा आहे.साक्षरतेच्या चळवळीमध्ये महिला शिक्षणाला विशेष महत्त्व आहे. स्त्री साक्षर झाली की तिच्या जीवनातच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते. शिक्षित महिला आपल्या आरोग्याबाबत अधिक जागरूक असते, मुलांच्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहते, कुटुंबातील आर्थिक व्यवहार समजून घेते आणि सामाजिक प्रश्नांवर स्वतंत्र मत व्यक्त करण्याची क्षमता विकसित करते. शिक्षणामुळे महिलांच्या आत्मविश्वासात वाढ होते आणि निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढतो. त्यामुळे मुलींच्या शिक्षणाकडे खर्च म्हणून नव्हे, तर समाजाच्या भविष्यातील विकासासाठीची गुंतवणूक म्हणून पाहण्याची गरज आहे. एका मुलीला शिक्षण मिळाले तर तिच्या माध्यमातून पुढील पिढ्यांपर्यंत ज्ञान आणि जागरूकतेचा वारसा पोहोचू शकतो.प्रौढ साक्षरतेचे महत्त्वही कमी नाही. बालपणी शिक्षण घेता आले नाही म्हणून व्यक्तीच्या शिकण्याच्या शक्यता संपत नाहीत. जीवनाच्या कोणत्याही टप्प्यावर शिक्षण घेण्याचा अधिकार प्रत्येकाला असला पाहिजे. अनेक प्रौढ व्यक्तींना गरिबी, रोजगार, कौटुंबिक जबाबदाऱ्या, स्थलांतर किंवा सामाजिक परिस्थितीमुळे औपचारिक शिक्षण घेता आलेले नसते. अशा व्यक्तींसाठी त्यांच्या वेळेनुसार आणि जीवनाशी संबंधित विषयांवर आधारित शिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्रौढ व्यक्ती साक्षर झाली की ती शासनाच्या योजनांचा लाभ अधिक सहजपणे घेऊ शकते, आर्थिक व्यवहार समजून घेऊ शकते, मुलांच्या शिक्षणात सहभागी होऊ शकते आणि समाजातील विविध प्रक्रियांमध्ये अधिक आत्मविश्वासाने भाग घेऊ शकते. म्हणून प्रौढ साक्षरता ही समाजाच्या विकासाची महत्त्वाची गुंतवणूक आहे.आज साक्षरतेच्या पारंपरिक संकल्पनेपलीकडे जाण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. केवळ अक्षर ओळखणे किंवा सही करणे ही साक्षरतेची अंतिम पायरी मानता येणार नाही. एखादी व्यक्ती वाचलेली माहिती समजून घेते का, तिच्या संदर्भाचा विचार करते का, योग्य-अयोग्य माहितीमधील फरक ओळखते का आणि मिळालेल्या ज्ञानाचा आपल्या जीवनात उपयोग करू शकते का, हे महत्त्वाचे आहे. म्हणून आज 'कार्यक्षम साक्षरता' ही संकल्पना अधिक महत्त्वाची ठरते. वाचन, लेखन आणि गणित या मूलभूत कौशल्यांचा उपयोग प्रत्यक्ष जीवनातील समस्या सोडविण्यासाठी करता येणे आवश्यक आहे. साक्षरता जीवनाशी जोडली गेली तरच ती व्यक्तीच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती देऊ शकते.डिजिटल क्रांतीमुळे साक्षरतेचे स्वरूप आणखी बदलले आहे. मोबाईल दूरध्वनी, संगणक आणि इंटरनेटने माहिती मिळविण्याची प्रक्रिया अतिशय सोपी केली आहे. काही क्षणांत जगाच्या कोणत्याही भागातील माहिती आपल्या हातात येते. परंतु माहितीचा वेग वाढला तसाच चुकीच्या माहितीचा प्रसारही वाढला आहे. सामाजिक माध्यमांवर फिरणारी प्रत्येक माहिती खरी असेलच असे नाही. खोट्या बातम्या, अफवा, बनावट संदेश, दिशाभूल करणारे दावे आणि आर्थिक फसवणुकीचे प्रकार नागरिकांसमोर नवी आव्हाने निर्माण करीत आहेत. त्यामुळे डिजिटल साधनांचा वापर करता येणे पुरेसे नसून माहितीची सत्यता तपासणे, विश्वासार्ह स्रोत ओळखणे, वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे आणि तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे. डिजिटल साक्षरता ही आधुनिक साक्षरतेची अनिवार्य बाजू बनली आहे.आर्थिक व्यवहारांचे वाढते डिजिटलीकरण पाहता आर्थिक साक्षरतेचे महत्त्वही वाढले आहे. बचत, बँक खाते, कर्ज, विमा, व्याज, डिजिटल व्यवहार आणि आर्थिक नियोजन याबाबत मूलभूत माहिती प्रत्येक नागरिकाला असणे आवश्यक आहे. आर्थिक अज्ञानामुळे अनेकदा व्यक्ती फसवणुकीला बळी पडते किंवा चुकीचे आर्थिक निर्णय घेते. त्यामुळे साक्षरतेचा अर्थ आर्थिक स्वावलंबनाशी जोडणे आवश्यक आहे. स्वतःच्या पैशांबाबत योग्य निर्णय घेता येणे ही व्यक्तीच्या आत्मनिर्भरतेची महत्त्वाची खूण आहे. त्याचप्रमाणे आरोग्यविषयक माहिती समजणे, औषधांच्या सूचना वाचणे, आरोग्यविषयक अफवांपासून सावध राहणे आणि योग्य वेळी आरोग्यसेवा घेणे यासाठी आरोग्य साक्षरता आवश्यक आहे.साक्षरता आणि लोकशाही यांचे नाते अत्यंत महत्त्वाचे आहे. लोकशाहीमध्ये नागरिकांना केवळ मतदानाचा अधिकार असणे पुरेसे नसते. शासनाच्या योजना, कायदे, सार्वजनिक प्रश्न आणि नागरिकांचे हक्क व कर्तव्ये यांची माहिती असणे आवश्यक असते. साक्षर नागरिकाला माहिती वाचता येते, तिचे परीक्षण करता येते आणि आपल्या मताची निर्मिती करता येते. त्यामुळे साक्षरता ही लोकशाहीतील अर्थपूर्ण सहभागाची पायाभरणी करते. विवेकी नागरिक समाजातील प्रश्नांवर विचार करू शकतो, सार्वजनिक संस्थांना प्रश्न विचारू शकतो आणि आपल्या अधिकारांसाठी कायदेशीर व लोकशाही मार्गाने प्रयत्न करू शकतो. म्हणून साक्षरता ही केवळ वैयक्तिक विकासाची बाब नसून लोकशाहीच्या सुदृढीकरणाचे साधन आहे.साक्षरतेबरोबर वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे हीदेखील काळाची गरज आहे. माहितीच्या युगात अंधश्रद्धा, अफवा आणि अप्रमाणित दावे वेगाने पसरू शकतात. एखादी गोष्ट ऐकली किंवा सामाजिक माध्यमावर पाहिली म्हणून ती खरी मानण्याऐवजी तिच्यामागील तथ्य तपासण्याची सवय लागणे आवश्यक आहे. प्रश्न विचारणे, पुराव्याचा शोध घेणे, तर्कशुद्ध विचार करणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे ही शिक्षणाची महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. अक्षरज्ञान जर विवेकाला जन्म देत नसेल तर साक्षरतेचे व्यापक सामाजिक उद्दिष्ट अपूर्ण राहते. त्यामुळे साक्षरतेपासून ज्ञानाकडे आणि ज्ञानापासून विवेकाकडे जाणारा प्रवास घडविणे आवश्यक आहे.वाचनसंस्कृती ही साक्षर समाजाची खरी ओळख आहे. परीक्षा आणि पदवीपुरते वाचन मर्यादित राहिले तर साक्षरतेची क्षमता संकुचित होते. पुस्तकांशी मैत्री असलेला समाज अधिक विचारशील, संवेदनशील आणि चिकित्सक बनतो. साहित्य, इतिहास, विज्ञान, समाजशास्त्र, चरित्रे, वर्तमानपत्रे आणि विविध ज्ञानशाखांतील ग्रंथ यांचे वाचन व्यक्तीच्या विचारविश्वाचा विस्तार करते. आज डिजिटल माध्यमे मोठ्या प्रमाणावर वापरली जात असली तरी पुस्तकांचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट माहितीच्या वेगवान प्रवाहात सखोल वाचनाची गरज अधिक वाढली आहे. घराघरांत वाचनाची सवय, शाळांमध्ये समृद्ध ग्रंथालये आणि गावागावांत सार्वजनिक वाचनालये निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे.साक्षरतेच्या प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शिक्षक हा विद्यार्थ्याला केवळ पाठ्यपुस्तकातील माहिती देणारा नसून विचार करण्याची दृष्टी देणारा मार्गदर्शक असतो. विद्यार्थ्यांच्या मनात प्रश्न निर्माण करणे, त्यांच्या अनुभवांना शिक्षणाशी जोडणे, वाचनाची आवड निर्माण करणे आणि ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध स्पष्ट करणे ही शिक्षकाची मोठी जबाबदारी आहे. आज शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर वाढत असताना शिक्षकाची भूमिका कमी होत नसून अधिक महत्त्वाची होत आहे. माहिती सहज उपलब्ध करून देण्यापेक्षा त्या माहितीचे आकलन, विश्लेषण आणि योग्य उपयोग करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे हे शिक्षणाचे खरे उद्दिष्ट ठरले पाहिजे.ग्रामीण आणि दुर्गम भागातील साक्षरतेचा प्रश्नही गंभीरपणे पाहण्याची गरज आहे. शाळेपर्यंत पोहोचण्याची अडचण, आर्थिक परिस्थिती, स्थलांतर, डिजिटल साधनांचा अभाव आणि कुटुंबातील जबाबदाऱ्या यांमुळे काही विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होतात. अशा परिस्थितीत शाळेत प्रवेश मिळणे ही पहिली पायरी आहे; परंतु विद्यार्थी शाळेत टिकून राहतो का आणि त्याला अपेक्षित ज्ञान व कौशल्ये मिळतात का, हे अधिक महत्त्वाचे आहे. शिक्षणातील सामाजिक आणि डिजिटल दरी कमी केल्याशिवाय साक्षरतेचे उद्दिष्ट पूर्ण होणार नाही. ग्रामीण भागातील शाळा, शिक्षक, ग्रंथालये, डिजिटल सुविधा आणि समुदायाचा सहभाग यांना अधिक बळ देणे आवश्यक आहे.रोजगाराच्या बदलत्या स्वरूपामुळे साक्षरतेसोबत कौशल्याधारित शिक्षणाची गरज वाढली आहे. आजच्या युवकाला केवळ प्रमाणपत्र नव्हे, तर बदलत्या कामाच्या जगाशी जुळवून घेण्याची क्षमता आवश्यक आहे. संगणकाचे प्राथमिक ज्ञान, संवादकौशल्य, आर्थिक व्यवहारांची समज, समस्या सोडविण्याची क्षमता आणि नवीन कौशल्य शिकण्याची तयारी या गोष्टी रोजगारक्षमतेत भर घालतात. ग्रामीण युवकांसाठी स्थानिक संसाधनांवर आधारित व्यवसाय, लघुउद्योग, शेतीपूरक उद्योग आणि स्वयंरोजगाराच्या संधींचे ज्ञान उपलब्ध करून दिल्यास साक्षरतेचा आर्थिक विकासाशी थेट संबंध निर्माण होऊ शकतो.भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वयंचलित तंत्रज्ञानामुळे शिक्षणाचे आणि रोजगाराचे स्वरूप आणखी बदलणार आहे. या बदलांच्या काळात साक्षरतेचा अर्थ तंत्रज्ञान समजून घेणे आणि त्याचा विवेकी उपयोग करणे असा अधिक व्यापक होईल. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून निर्माण झालेली माहिती योग्य आहे का, तिचा स्रोत काय आहे, तिचा उपयोग कोणत्या मर्यादेत करावा आणि मानवी विवेकाची भूमिका काय असावी, याचे भान निर्माण करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी मानवी मूल्ये, संवेदनशीलता, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व कायम राहणार आहे.साक्षरतेचा प्रसार ही केवळ शासनाची जबाबदारी नाही. शासनाने आवश्यक धोरणे, सुविधा आणि आर्थिक संसाधने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे; परंतु समाजाचा सहभाग त्याला दिशा देतो. शिक्षक, पालक, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी एकत्रितपणे साक्षरतेला सामाजिक चळवळीचे स्वरूप दिले पाहिजे. एखाद्या निरक्षर व्यक्तीला अक्षरज्ञान देणे, एखाद्या मुलाला शिक्षणात टिकवून ठेवण्यासाठी मदत करणे, एखाद्या महिलेला डिजिटल व्यवहार शिकविणे किंवा एखाद्या ज्येष्ठ व्यक्तीला आवश्यक माहिती समजावून सांगणे या छोट्या कृती समाजपरिवर्तनाच्या मोठ्या प्रक्रियेला हातभार लावू शकतात.साक्षरता ही एकदाच पूर्ण होणारी प्रक्रिया नाही. जग सतत बदलत आहे आणि त्या बदलांसोबत शिकण्याची गरजही सतत निर्माण होत आहे. त्यामुळे 'आयुष्यभर शिक्षण' ही संकल्पना साक्षरतेचा पुढील टप्पा आहे. बालकापासून ज्येष्ठ नागरिकापर्यंत प्रत्येक व्यक्तीला नव्या ज्ञानाशी जोडण्याची संधी मिळाली पाहिजे. व्यक्तीने नवे कौशल्य शिकले, वाचनाची सवय ठेवली, तंत्रज्ञान समजून घेतले आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेतले तर तिची साक्षरता अधिक अर्थपूर्ण होते. शिक्षणाची प्रक्रिया शाळेच्या भिंतींपलीकडे आणि पदवीच्या प्रमाणपत्रापलीकडे नेण्याची गरज आहे.जागतिक साक्षरता दिनाच्या निमित्ताने म्हणूनच साक्षरतेच्या पारंपरिक चौकटीपलीकडे पाहणे आवश्यक आहे. आज आपल्याला केवळ अक्षर ओळखणारे नागरिक नकोत, तर माहिती समजून घेणारे, विवेकाने निर्णय घेणारे, वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणारे, तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करणारे, आर्थिकदृष्ट्या सजग आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील नागरिक घडवायचे आहेत. साक्षरता व्यक्तीला माहिती देते; शिक्षण त्या माहितीचे ज्ञानात रूपांतर करते; विवेक त्या ज्ञानाला योग्य दिशा देतो आणि सामाजिक जबाबदारी त्या ज्ञानाचा समाजहितासाठी उपयोग करण्याची प्रेरणा देते. हा संपूर्ण प्रवासच साक्षरतेचा खरा अर्थ स्पष्ट करतो.८ सप्टेंबरचा जागतिक साक्षरता दिन हा त्यामुळे केवळ एक औपचारिक दिनविशेष न राहता समाजाच्या आत्मपरीक्षणाचा दिवस ठरला पाहिजे. आपल्या आजूबाजूला अजून कोण शिक्षणापासून दूर आहे, कोणाला वाचन-लेखनाची अडचण आहे, कोणाला डिजिटल साधनांचा वापर करता येत नाही, कोणाला आर्थिक व्यवहारांची माहिती नाही किंवा कोणाला आपल्या अधिकारांची जाणीव नाही, याचा विचार करण्याची गरज आहे. साक्षरतेचे यश केवळ आकडेवारीत नसते; ते व्यक्तीच्या बदललेल्या जीवनात दिसते. जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःचे नाव वाचते, स्वतःचा अर्ज भरते, स्वतःचा आर्थिक व्यवहार करते, आपल्या मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घेते आणि आपल्या हक्कांसाठी आत्मविश्वासाने उभी राहते, तेव्हा साक्षरतेचा खरा विजय होतो.अक्षर लहान असते; परंतु त्यातून निर्माण होणारी शक्ती अफाट असते. अक्षरातून शब्द, शब्दातून विचार, विचारातून विवेक आणि विवेकातून परिवर्तन जन्माला येते. म्हणून साक्षरतेचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे ही केवळ शैक्षणिक गरज नाही, तर सामाजिक न्यायाची आणि राष्ट्रनिर्मितीची आवश्यकता आहे. समाजातील कोणताही घटक ज्ञानापासून वंचित राहू नये, प्रत्येकाला शिकण्याची संधी मिळावी आणि प्रत्येक व्यक्तीला आपल्या ज्ञानाच्या बळावर सन्मानाने जगता यावे, हेच साक्षरतेचे अंतिम ध्येय असले पाहिजे. अक्षरज्ञानातून स्वावलंबन, स्वावलंबनातून आत्मविश्वास, आत्मविश्वासातून सहभाग आणि सहभागातून परिवर्तन हा साक्षरतेचा खरा प्रवास आहे. या प्रवासात एकही व्यक्ती मागे राहू नये, प्रत्येक मनात शिकण्याची जिज्ञासा निर्माण व्हावी आणि ज्ञानाची ज्योत पिढ्यान्‌पिढ्या तेवत राहावी, हाच जागतिक साक्षरता दिनाचा खरा संदेश आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

ईमेल — bagate.rajendra5@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०८ सप्टेंबर २०२६


## श्रावण महिन्यानिमित्त नगरेश्वर मंदिरात लाखो लिंगार्चन




**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** श्रावण महिन्याचे औचित्य साधत जिंतूर शहरातील प्राचीन श्री नगरेश्वर मंदिरात मागील तीस वर्षापासून परम पूज्य महेश चैतन्य स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाने पवित्र सानिध्यामध्ये दररोज मोठ्या भक्तिभावाने लिंगार्चन पूजेचे आयोजन करण्यात येत असून, या धार्मिक उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे...समाजातील 18 वा अध्याय भगवद्गीता मुखोद्गत असणाऱ्या महिला पुरुषांचा व मुलांचा सत्कार करण्यात आला.. आर्य वैश्य कोमटी समाजाच्या वतीने आयोजित या उपक्रमात दररोज महापूजा, 'ॐ नमः शिवाय' मंत्रजप, अभिषेक, लिंगार्चन व महाआरती पार पडत असून मंदिर परिसर शिवभक्तांच्या जयघोषाने दुमदुमून जात आहे..श्रावण महिना हा भगवान शंकराच्या उपासनेसाठी अत्यंत पवित्र मानला जातो...यानिमित्ताने मंदिरात दररोज भाविक उपस्थितीत लिंगार्चन पूजेत सहभागी होत आहेत...तसेच नगरेश्वर महादेव यांचा २६ वा स्थापना दिवस मोठ्या थाटामाटा मध्ये साजरा करण्यात आला..विशेष म्हणजे महिला भक्तांचा सहभाग लक्षणीय असून सकाळपासूनच मंदिर परिसरात दर्शन, पूजा व आरतीसाठी भाविकांच्या रांगा लागलेल्या दिसत आहेत.आर्य वैश्य कोमटी समाजाच्या वतीने दरवर्षी श्रावण महिन्यात हा धार्मिक उपक्रम सातत्याने राबविला जातो. समाजातील पदाधिकारी व कार्यकर्ते भाविकांसाठी आवश्यक व्यवस्था करत असून, श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळत आहे. श्रावणातील प्रत्येक सोमवारी तसेच विशेष तिथींना भाविकांची संख्या अधिक वाढत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. श्रावण महिन्यामध्ये होणाऱ्या लिंग अर्चनाचे महत्त्व ॲड योगेश उन्हाळे यांनी सांगितले..नगरेश्वर मंदिरातील या धार्मिक वातावरणामुळे संपूर्ण शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, श्रावण महिन्यातील लिंगार्चन पूजेमुळे भाविकांना अध्यात्मिक समाधान लाभत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

मंदिरात सुरू असलेला 'ॐ नमः शिवाय' मंत्रजप आणि सामूहिक आरतीमुळे परिसरात भक्तिरसाची अनुभूती होत असून, श्रावण महिन्याच्या अखेरपर्यंत हा उपक्रम नियमितपणे सुरू राहणार आहे.




## कंटेकुर येथे आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची २३५ वी जयंती उत्साहात साजरी



**मुरुम (मुरुम, प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कंटेकुर येथे आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची 235 वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शौर्य आणि स्वाभिमानाची भावना जागृत करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन राम कलबुर्गे व आप्पाराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मीकांत पटणे सर यांनी विद्यार्थ्यांना राजे उमाजी नाईक यांच्या जीवनकार्याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. अन्यायाविरुद्ध लढण्याची त्यांची जिद्द, स्वाभिमान आणि देशप्रेम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच उमाजी नाईक यांचे विचार आपल्या आचरणात आणावेत, असा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मीकांत पटणे सर, कलशेट्टी सर, नदाफ सर, सूर्यवंशी सर, पाटील मॅडम, शिकारे मॅडम दिगंबर दासे, रुक्मिणी जमादार, राम कलबुर्गे, उमेश जमादार, व्यंकट घोटाळे, प्रशांत गुरव, कृष्णा घोटाळे, आप्पाराव पाटील यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या शौर्य व क्रांतिकारी विचारांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याची माहिती मिळाली.

## दिल्ली येथील पत्रकारावर मारहाण प्रकरणाचे निषेध करून चौकशीची मागणी




**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** दिल्ली येथे महिला पत्रकार शाहीन खान व नफीसा खान यांच्यासोबत पोलीस ठाण्यात कथितरीत्या झालेल्या मारहाण व गैरवर्तनाचा तीव्र निषेध तसेच निष्पक्ष व स्वतंत्र चौकशी करण्या ची मागणीचे निवेदन जिंतूर तहसीलदार मार्फत भारताचे प्रधानमंत्री, व गृहमंत्री यांना देण्यात आले आहे दिल्ली येथे महिला पत्रकार शाहीन खान व नफीसा खान यांच्यासोबत पोलिसां कडून कथितरीत्या करण्यात आलेली मारहाण, गैरवर्तन व अमानवीय वर्तनाची अत्यंत गंभीर व चिंताजनक घटना आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. प्राप्त वृत्तांनुसार तसेच संबंधित पत्रकारांनी केलेल्या आरोपांनुसार, एका कार्यक्रमाचे वार्तांकन करत असताना दोन्ही महिला पत्रकारांना पोलिसांनी ताब्यात घेऊन साकेत पोलीस ठाण्यात नेले. तेथे त्यांच्यासोबत कथितरीत्या मारहाण करण्यात आली. दोन्ही पत्रकारांनी आपल्या शरीरावरील दुखापतींचे व कथित मारहाणीचे व्रणही सार्वजनिक केले आहेत. त्यांनी संबंधित पोलिस कर्मचाऱ्यांवर गंभीर आरोप केले असून या संपूर्ण प्रकरण मधील, स्वातंत्र्य निष्पक्ष चौकशी, सीसीटीव्ही फुटेज सुरक्षित करण्यात यावे, वैधकीय अहवालाचा तपासात आधार घ्यावा, दोषी पोलीस कर्मचारी कठोर कारवाई करावी, पत्रकारांची सुरक्षा सुनिश्चित करावी, महिला पत्रकारांच्या सन्मानाचे संरक्षण करावे आदी मागण्याचे निवेदन जिंतूर तहसीलदार मार्फत देण्यात आले असून निवेदनावर अहेमद सिद्दिकी अध्यक्ष जमाती इस्लामी शाखा जिंतूर, पंढरीनाथ शिंदे अध्यक्ष भावना मंच जिंतूर, शेख मतीन तांबोळी जिल्हा अध्यक्ष भाजपा अल्पसंख्याक मोर्चा, सुरेश प्रल्हादराव सानप सत्यशोधक विद्यार्थी संघटना, शेख गुलजार शेख समद, अध्यक्ष एकता क्रीडा मंडळ, असीम मिर्झा प्राध्यापक, मोहम्मद अथर मो. नूर गरसेवक, सुंदर मस्के, सुनील भिसे सुलेमान सिद्दिकी, मोहसीन खान,शाहेद सिद्दीकी यांच्यासह शहरातील सुजाण नागरिकांचे स्वाक्षरी आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०८ सप्टेंबर २०२६


## उमरगा शहर पोलीस ठाण्यात संत निरंकारी फाउंडेशनच्या वतीने स्वच्छता अभियान व वृक्षारोपण संपन्न




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे जसे सुसंस्कृत नागरिक घडतात, तसेच स्वच्छ आणि निरोगी वातावरणामुळे उत्तम समाज निर्मितीला हातभार लागतो, हा संदेश देत उमरगा शहर पोलीस ठाणे आणि संत निरंकारी फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (ता. 5) शिक्षक दिनाचे औचित्य साधून पोलीस ठाणे परिसर व परिसरात भव्य स्वच्छता अभियान आणि वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.उमरगा शहर पोलीस ठाण्याचे प्रमुख, पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या उपक्रमाची सुरुवात पोलीस ठाण्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि निरंकारी फाऊंडेशनच्या स्वयंसेवकांनी मिळून संपूर्ण पोलीस ठाण्याचा परिसर स्वच्छ करण्यापासून केली. श्रमदानातून ठाण्यातील प्रत्येक कोपरा चकाचक करण्यात आला. यानंतर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पोलीस ठाण्याच्या परिसरात विविध प्रकारच्या छायादार व शोभिवंत रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी लावलेल्या रोपांचे संगोपन करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संत निरंकारी फाऊंडेशनचे मुरूम ब्रँच मुखी दयानंद साखरे, उमरगा प्रबंधक लक्ष्मण पांगे, सेवादल इंचार्ज बिरू बंदीछोडे, दत्तात्रय बोडरे, कमलाकर पांचाळ, आणि सेवादल महिला प्रतिनिधी मंगल बनसोडे, आशा भुजबळ, छाया बिराजदार, सुरेखा जांभळे, गोकर्णा स्वामी, सरस्वती जाधव, पद्मीन माने, निर्मला कोरचगावकर, अनिता आष्टे, ज्योती अंबुलगे, संगीता बनसोडे आदींनी विशेष परिश्रम घेऊन पुढाकार घेतला.यावेळी पोलीस विभागाकडून सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग कन्हेरे, सपोनि पिराजी तायवाडे, पोउनि रामहरी चाटे यांच्यासह चंद्रकांत चव्हाण (दाळींब), हरिकिशन पवार (येळी), भास्कर पाटील, कमलाकर जाधव, हणमंत पोतदार, बालाजी बिराजदार, राजू पाटील, काशिनाथ आष्टे, हरिभाऊ बिराजदार, दशरथ कोकणे, दिलीप जांभळे, हणमंत पंडित, विजय बिराजदार, महेश वासगी, व्यंकटेश कलशेट्टी, संगमेश्वर स्वामी, व्यंकट माळी, महादेव अंबुलगे, व्यंकट कोराळे, अनिल बनसोडे, सुधाकर हिराळे, कल्लेश्वर पांचाळ, सुरेश कोळी, तुकाराम शेवाळे, व्यंकट मंडले, सुरेश मंडले, हणमंत मंडले आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पोलिसांसारख्या व्यस्त आणि जबाबदारीच्या यंत्रणेने व सामाजिक आध्यात्मिक संघटनेने हाती घेतलेल्या या उपक्रमाचे उमरगा शहरात सर्वत्र कौतुक होत असून, हा कार्यक्रम परिसरातील नागरिकांसाठी एक आदर्श प्रेरणा ठरला आहे.






## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा



**उमरगा** : भारत शिक्षण संस्था, उमरगा संचलित श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे वाणिज्य विभागाच्या वतीने शिक्षक दिन मोठ्या उत्साहात व आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती, महान तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि आदर्श शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी 5 सप्टेंबर हा दिवस संपूर्ण देशभरात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या जीवनातील शिक्षकांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. अजित अष्टे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले उपस्थित होते. तसेच डॉ. खंडू मुरळीकर, डॉ. विजय मुळे, प्रा. पवार, प्रा. विशाल, प्रा. दीपक, प्रा. सुरज सूर्यवंशी, प्रा. सचिन, प्रा. होलगुंडे वर्षा यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले की, शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान देणारा घटक नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा देणारा मार्गदर्शक असतो. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ होते; मात्र त्या ज्ञानाला संस्कार, नीतिमूल्ये आणि सामाजिक बांधिलकीची जोड मिळाल्यास विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आधुनिक शिक्षण घेत असताना आपल्या संस्कृतीचा, परंपरांचा आणि संस्कारांचा विसर पडू देऊ नये."विद्यार्थ्यांनी आपले संस्कार, नीतिमूल्ये आणि संस्कृती जपत अध्ययन करावे. शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न करता समाज आणि राष्ट्राच्या विकासासाठी करावा," असे आवाहन प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी यावेळी केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, शिस्त, नेतृत्वगुण आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे कार्य सातत्याने करावे, असेही त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. अजित अष्टे यांनी शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देताना शिक्षक-विद्यार्थी संबंधांचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षकांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच मिळत नाही, तर जीवनातील विविध आव्हानांना सामोरे जाण्याची प्रेरणा आणि आत्मविश्वास मिळतो. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये यांचा समन्वय साधून आपल्या भवितव्याची वाटचाल करावी, असे त्यांनी सांगितले.यावेळी उपस्थित प्राध्यापकांनीही विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच सर्वांगीण विकासासाठी केलेल्या योगदानाची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करून शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे आपल्या जीवनाला योग्य दिशा मिळत असल्याचे सांगितले. शिक्षकांचे योगदान हे विद्यार्थ्यांच्या यशामागील महत्त्वाचे कारण असून, शिक्षकांचा आदर करणे ही विद्यार्थ्यांची नैतिक जबाबदारी असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांमध्ये शिक्षक दिनाबाबत उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. ज्ञान, संस्कार आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम, जबाबदार आणि संवेदनशील नागरिक घडविण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सुरज सुरवसे यांनी अतिशय प्रभावीपणे केले. त्यांनी शिक्षक दिनाचा इतिहास, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान आणि शिक्षकांच्या कार्याचे महत्त्व याविषयी माहिती दिली. शेवटी कु. प्रियंका इंगळे यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.शिक्षक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. "ज्ञानासोबत संस्कार आणि मूल्ये आत्मसात करून जबाबदार नागरिक घडविणे" हा संदेश देत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.